**प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप २०२२ व रब्बी २०२२-२३ मधील ८०:११० मॉडेलनुसार राज्य शासनाने ११० % पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईची भारतीय कृषि विमा कंपनीला अदा करावयाची दायित्व रक्कम रु.१८,५८,८०,९४७/- इतकी रक्कम वितरीत करण्याबाबत.**

---

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०२५/प्र.क्र.१७४/११ अे,ई.ऑ.क्र.११७७७५९**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक: ३० मार्च, २०२६.

**वाचा:-**

१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.७२/११- अे, दि.१.०७.२०२२

२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अे, दि.२४.०८.२०२२

३) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अे, दि.१३.०१.२०२३

४) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अे, दि.१.०३.२०२३

५) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अे, दि.१८.९.२०२३

६) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अे, दि.२३.९.२०२३

७) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अे, दि.०१.०३.२०२४

८) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५

९) विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी यांचे पत्र क्र. AIC.MRO/PMFBY/KHARIP-२२/७४७७/२५, दि.१८.११.२०२५

१०) संचालक(कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.कृआ/प्रपिवियो/सां.८ /मागणी/र-७३/२०२६, दि.३०.०१.२०२६

**प्रस्तावना:-**

राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२२ व रब्बी हंगाम २०२२-२३ या कालावधीत भारतीय कृषि विमा कंपनी, आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंशुरन्स कं.लि., बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स कंपनी ,एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी व युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कंपनी या ५ विमा कंपनींमार्फत दि.०१.०७.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात आली. भारतीय कृषि विमा कंपनी ही राज्यात विमा कंपन्यांची समन्वयक कंपनी आहे. भारतीय कृषि विमा कंपनीने संदर्भ क्र. (९) अन्वये प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२२ व रब्बी हंगाम २०२२-२३ मधील ८०:११० मॉडेलनुसार राज्य शासनास ११० % पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे दायित्व रकमेकरिता रु.१८,५८,८०,९४७/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने संचालक(कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र. (१०) अन्वये केलेल्या

विनंतीस अनुसरून, प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२२ व रब्बी हंगाम २०२२-२३ मधील ८०:११० मॉडेलनुसार ११० % पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे दायित्व रकमेकरिता रु.१८,५८,८०,९४७/- इतका निधी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील शिल्लक रकमेतून भारतीय कृषि विमा कंपनीस अदा करण्यासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

भारतीय कृषि विमा कंपनीने सादर केलेली मागणी व कृषि आयुक्तालयाची शिफारस विचारात घेता प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२२ व रब्बी हंगाम २०२२-२३ मधील ८०:११० मॉडेलनुसार ११०% पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे दायित्व रकमेकरिता रु.१८,५८,८०,९४७/- इतका निधी भारतीय कृषि विमा कंपनीस प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील शिल्लक रकमेतून खालीलप्रमाणे वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**खरीप २०२२ व रब्बी २०२२-२३**

| विमा कंपनीचे नांव | समुह क्रमांक | एकूण विमा हप्ता रक्कम रु. कोटी | एकूण अंतरीम नुकसान भरपाई रक्कम रु. कोटी | नुकसान भरपाईचे विमा हप्त्याशी प्रमाण (%) (स्तंभ ४/स्तंभ ३ *१००) | ११०% पेक्षा जास्तीची देय नुकसान भरपाई (%) (स्तंभ ५-११०) | राज्य शासनास ११०% पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे दायित्व रक्कम रु. कोटी (स्तंभ ३* स्तंभ ६/१००) | राज्य शासनाने यापुर्वी वितरीत केलेली ११०% पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे दायित्व रक्कम रु. कोटी | ११०% पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे प्रलंबित दायित्व रक्कम रु. कोटी (स्तंभ ७-स्तंभ ८) | विमा कंपनीच्या देयकानुसार वितरित करण्यात येणारी ११०% पेक्षा जास्तीच्या नुकसान भरपाईचे प्रलंबित दायित्व रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| भारतीय कृषी विमा कंपनी | ९ | ३५१.४१ | ५८७.९३ | १६७.३१ | ५७.३१ | २०१.३९ | १८३.३३४५ | १८.०५५५ | १८,०४,३५,९४७/- |
| | १० | ५३१.९२ | ६३६.४८ | ११९.६६ | ९.६६ | ५१.३८ | ५०.८२१७ | ०.५५८३ | ५४,४५,०००/- |
| **एकूण** | | **८८३.३३** | **१२२४.४१** | | | **२५२.७७** | **२३४.१५६२** | **१८.६१३८** | **१८,५८,८०,९४७/-** |

२. सदरची रक्कम खरीप २०२२ व रब्बी हंगाम २०२२-२३ करीता वितरीत करण्यात येत असून त्याचा वापर यापूर्वीच्या इतर हंगामाकरीता अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयानुसारच खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि) यांची राहील.

४. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग अनौप. संदर्भ क्र.१९८/२०२५/व्यय-१, दि.२८.०३.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३३०२०३५४५१८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

PRATIBHA
MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.03.30 20:36:29 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
३. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११.वित्त विभाग (व्यय-१/ अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई- ३२
१२.उप सचिव (११-अे /२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१३.कक्ष अधिकारी (२- अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४.विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, लोक चेंबर्स, मरोल मरोशी नाका, मरोल. अंधेरी(पूर्व), मुंबई - ४०० ०५९.
१५.विभागीय व्यवस्थापक, एचडीएफसी इर्गो इंन्शुरन्स कं. लि. डी-१०३ तीसरा मजला ईटन बिझनेस, डिस्ट्रीक्ट एल.एस.बी. मार्ग भांडूप (पश्चिम), मुंबई- ४०००७८
१६.विभागीय व्यवस्थापक, आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंशुरन्स कं.लि., आयसीआयसीआय हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, सिध्दीविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई- ४०० ०२५.
१७.विभागीय व्यवस्थापक, युनायटेड इंडिया इन्शरन्स कंपनी लिमिटेड, ३ रा मजला, काकडे बिझ आयकोन युनिट क्र.२०२ ते २०७, गणेशखिंड मार्ग, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
१८. निवड नस्ती (कार्यासन ११-अे).